Indian Academy of Pediatrics (IAP)
महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण ५७ :

# मुलाची हृदयशस्त्रक्रिया झाल्यावर घ्यावयाची काळजी

कोणत्याही शस्त्रक्रियेनंतर शस्त्रक्रियेच्या गंभीरतेनुसार कमी जास्त काळजी घ्यावी लागतेच मात्र हृदयावर केलेल्या शस्त्रक्रियेनंतर बाळाला विशेष काळजीची गरज पडते. मात्र ही काळजी घेतल्यास त्या बाळाचा शस्त्रक्रियेपश्चातचा काळ व्यवस्थित तर जातोच आणि ते मुल जवळजवळ पूर्णपणे नॉर्मल आयुष्य जगू शकते.


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवादक : डॉ. जयंत पांढरीकर
पुनरावलोकन : डॉ. उज्वला गवळी, अविनाश शिरगावकर

*Conveners:* **Parvathi U Iyer, Krishna S Iyer**

*Members:* **Deepak Changlani, Munesh K Tomar, Nalinikant Panigrahy**




## पालकांद्वारे या विषयावर वारंवार विचारले जाणारे दहा प्रश्न....

१) माझ्या मुलाच्या हृदयामध्ये दोष आहे असे मला सांगितले गेले आहे तर मी काय करावे? माझा मुलगा पूर्णपणे नॉर्मल होऊ शकतो का व दीर्घायुषी होऊ शकतो का?

२) हृदयामध्ये दोष असलेल्या माझ्या मुलाची मी काळजी कशी घ्यावी? त्याला कुठले अन्न द्यावे? त्याला लसीकरण सर्वसाधारण मुलांप्रमाणे करता येईल का?

३) माझ्या मुलाला आंघोळ घालता येईल का? त्याला त्यामुळे न्युमोनिया तर होणार नाही ना?

४) माझ्या मुलाला त्याच्या हृदयातील दोषाकरिता विना शस्त्रक्रिया किंवा कॅथेटर प्रक्रिया सांगितली आहे. ती प्रक्रिया नेमकी काय आहे?

५) माझ्या मुलाला हृदयातील दोषाकरिता विनाशस्त्रक्रिया उपचार पद्धती सांगितली आहे तेव्हा मी या उपचारानंतर काय अपेक्षित काळजी घ्यावी?

६) माझ्या मुलाला हृदयाची शस्त्रक्रिया सांगितली आहे. यामध्ये नेमके काय केले जाते याचे मार्गदर्शन करावे.

७) माझ्या मुलाची हृदयाची शस्त्रक्रिया झालेली आहे, आता त्याची काळजी कशी घ्यावी?

८) त्याचा आहार, त्याचे लसीकरण, त्याच्या आंघोळ करणे याबाबत सांगावे.

९) त्याने कुठले मैदानी खेळ खेळावे? तो शाळेत जाऊ शकतो का?

१०) त्याची हृदयाची शस्त्रक्रिया झालेली आहे.त्यानंतर त्याने कुठला व्यवसाय निवडावा? तो/ती लग्न करू शकतात का? किंवा त्यांना मूलबाळ होऊ द्यावे की नाही?


Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# 57

# मुलाची हृदयशस्त्रक्रिया झाल्यावर घ्यावयाची काळजी

**प्रश्न (१)**

## माझ्या मुलाच्या हृदयामध्ये दोष आहे असे मला सांगितले गेले आहे तर मी काय करावे? माझा मुलगा पूर्णपणे नॉर्मल होऊ शकतो का व दीर्घायुषी होऊ शकतो का ?

मुलांमध्ये सर्वात जास्त जन्मजात हृदय दोषांचे प्रमाण म्हणजे हृदयामध्ये छिद्र असणे किंवा दोन कप्प्यामधील कप्प्या आतून जोडलेला असणे. (हा पडदा सुदढ मुलांमध्ये बंद असतो). या दोषांना ऍट्रियलसेप्टल छिद्र (SD ) व्हेन्ट्रिक्युलर सेप्टल छिद्र (VSD) व पेटंटडक्टस आर्टेरिओसस (PDA) म्हणजे दोन मोठ्या धमन्यांतील नळी (PDA) असे म्हणतात. इतरही दोष आढळून येतात, उदा : हृदयाच्या झडपा जन्मतःच आकुंचन पावलेल्या असणे, ज्यामुळे रक्तप्रवाह जाण्यास अडथळा निर्माण होतो. बाळ निळे दिसण्याचं सर्वात मुख्य कारण म्हणजे टेट्रॉलॉजी ऑफफ्लोट. यामध्ये एक झडप खूप जास्त आकुंचित झालेली असते व दोन कप्प्या मध्ये (व्हेन्ट्रीक्युलर कप्प्यामध्ये) मोठे छिद्र असतं. तसेच दोन मोठ्या झडपा एकमेकांवर चिकटून असतात.

तुमच्या मुलाला हृदयदोष आहे असे सांगितले गेले असेल तर अशा वेळेस तुम्ही बालहृदयाशस्त्र चिकित्सक किंवा बाल शस्त्रक्रिया तज्ञ यांना भेटावे व त्यांच्या मार्गदर्शनाने, शस्त्रक्रियेची गरज आहे की नाही हे समजून घ्यावे.

हृदय दोष असणाऱ्या बऱ्याच मुलांना उपचारानंतर चांगला फायदा होतो व ती संपूर्ण निरोगी दीर्घायुष्य जगू शकतात आणि तेही चांगल्या प्रतीचे. तेव्हा पालक म्हणून तुम्हाला घाबरून जायचे किंवा निराश होण्याचे कारण नाही.

**प्रश्न (२)**

## मी माझ्या मुलाची काळजी कशी घ्यावी? त्याला कुठले अन्न/आहार द्यावा? त्याचे लसीकरण इतर मुलांसारखे करू शकतो का?

- सर्व नवजात बालकांना आणि एक वर्षापर्यंत मुलांना स्तनपान द्यायला हवे. अशी मुलं बरेचदा दूध पिताना लवकर थकतात तेव्हा त्यांना थोड्या थोड्या अंतराने वारंवार आईचे दूध पाजावे. कधीकधी मुले उलटी करण्याची शक्यता असते, अशावेळी त्यांना पाठीवर थोपटून दूध पाजल्यानंतर एका कडेवर झोपवावे जेणेकरून त्याची उलटी श्वासनलिकेत जाणार नाही आणि त्याला/तिला श्वास घेण्यास अडथळा होणार नाही.
- कधीकधी वारंवार उलटी होत असल्यास औषधांची गरज भासू शकते. मोठ्या मुलांना सर्वसाधारण इतर मुलांप्रमाणे दिला जाणारा आहार देता येतो. काही मुलांना पातळ पदार्थांवर नियंत्रण ठेवावे लागते. अशा मुलांना अर्धघन अन्न देता येते, जेणेकरून भरपूर प्रमाणात दिला जाणारा आहार म्हणजे दूध किंवा ज्यूस हे टाळता येऊ शकते.
- बरेच पालक दुधामध्ये पाणी घालून देतात परंतु असे करू नये. यामुळे तुमच्या मुलाला उष्मांक कमी मिळतात व त्याचे वजन वाढत नाही.

ज्या मुलांची हृदय शस्त्रक्रिया झालेली नसते. अशा मुलांना उष्मांकाची गरज जास्त भासते.

हृदयदोष असणाऱ्या मुलांना इतर मुलांसारखे लसीकरण देता येऊ शकते परंतु जर मुलाची हृदय शस्त्रक्रिया झाली असेल तर अशा मुलांना सहा आठवड्यांनंतर लसीकरण पूर्ववत सुरू करता येतं .

**प्रश्न (३)**

## मी माझ्या मुलाला आंघोळ घालू शकते का? त्यामुळे त्याला फुफ्फुसाचा संसर्ग अर्थातच न्युमोनिया तर होणार नाही ना?


नाही आंघोळ केल्यामुळे कधीही फुफ्फुसाचा संसर्ग अर्थात न्युमोनिया होत नाही. किंबहुना बाळांना गरम पाण्याने आंघोळ झाल्यानंतर कोरडे पुसावे. जर अशा बाळाला वारंवार आंघोळ नाही घातली तर त्याच्या त्वचेवर वाईट विषाणूंचा संसर्ग होऊ शकतो आणि ज्यामुळे त्याला घातक संसर्गजन्य आजार होऊन त्याच्या हृदयात संसर्ग पसरण्याची शक्यता होऊ शकते.

प्रश्न
(४)

## माझ्या मुलाला विना शस्त्रक्रिया कॅथेटर पद्धतीने हृदयावरील उपचार पद्धती सुचविली आहे तर ही उपचार पद्धती कशी आहे?

- बरेचसे हृदयातील दोष हे विना शस्त्रक्रियेने किंवा कथेटर उपचार पद्धतीने दुरुस्त केले जाऊ शकतात. कॅथेटर उपचार पद्धती किंवा विनाशस्त्रक्रिया उपचार पद्धती ही बाल हृदयशास्त्र तज्ञ करतात.
- एक लांब व बारीक नळी ज्याला 'कॅथेटर' म्हणतात ती धमन्यांमध्ये टाकली जाते, विशेषतः जांघेच्या भागातून. आणि ती थेट हृदयापर्यंत पोहोचते. ही कृती फ्लूरोस्कोपीच्या मार्गदर्शनात केली जाते. त्याला एक्स–रे इमेजिंग म्हणतात.
- हे कॅथेटर आता हृदयातील लहान–मोठे दोष बंद करण्याकरता वापरले जातात. उदा: हृदयातील छिद्र, ASD, VSD, PDA यामध्ये कॅथेटरच्या एका टोकाला बंद करण्याचे उपकरण लावलेले असते. एखादी झडप खूपच अरुंद असेल किंवा घट्ट असेल तर ती याद्वारे उघडली जाते. हा फुगा कॅथेटरच्या एका टोकाला असतो आणि अशा पद्धतीला 'बलूनिंग' असे म्हणतात.
- हे कॅथेटर हृदय दोषाचे अचूक निदान करण्याकरिता तसेच हृदयातील कप्प्यांमधील दाब मोजण्याकरिता वापरले जाते. ज्या हृदय दोषांकरिता मुलाची शस्त्रक्रिया करावी लागणार आहे अशांकरिता आणि ज्यावेळी हृदयदोष गुंतागुंतीचे आहेत त्यासाठी हे महत्त्वाचे आहे.
- अशा परिस्थितीमध्ये तेथील संदर्भातील अचूक माहिती या कॅथेटरद्वारे सर्जनला मिळू शकते. सर्वसाधारणपणे सर्वात जास्त वापरली जाणारी विना शस्त्रक्रिया पद्धतीही ASD दोष बंद करण्याकरिता वापरली जाते. (ASD म्हणजे हृदयाच्यावरील दोन लहान कप्प्यामधील असणाऱ्या पडद्यात असणारे छिद्र). हे बुजवण्यासाठी ही विनाशस्त्रक्रिया पद्धती वापरली जाते.

खालील चित्रात ASD अट्रियल सेप्टल डिफेक्ट हे छिद्र विना शस्त्रक्रिया पद्धतीने कसे जोडले जाते हे दर्शविले आहे. चित्र एक अ आणि ब इतर पद्धती याच तत्त्वावर आधारित आहेत.




**चित्र एक अ आणि ब :** विना शस्त्रक्रिया ASD बंद करण्याची पद्धत

मुलांची हृदयशस्त्रक्रिया झाल्यावर घ्यावयाची काळजी

प्रश्न (५)

## माझ्या मुलाला विनाशस्त्रक्रिया उपचार पद्धती ही त्याच्या हृदय दोषाकरिता सुचविली आहे. तेव्हा या उपचारपद्धतीनंतर मी काय काळजी घ्यावी?

आश्चर्यकारकरित्या बहुतांश रुग्णांमध्ये या उपचारपद्धतीसाठी फक्त दोन ते चार दिवस रुग्णालयात राहावे लागते. या उपचारपद्धतीकरिता तुमच्या मुलाला एक दिवस अगोदर संध्याकाळी किंवा त्याच दिवशी सकाळी भरती करावे लागते. तुमच्या मुलाला उपचारपद्धती दरम्यान किंवा नंतर दुखत असल्यास औषधे दिली जातात आणि त्यानंतर तुमचा मुलगा लगेच शुद्धीवर येऊ शकतो. काही रुग्णांमध्ये पूर्ण भूल द्यायची गरज पडू शकते.

जर हृदयरोग तज्ञांना वाटत असेल तर कॅथेटर उपचारपद्धती ही फ्लूरोस्कोपीच्या मार्गदर्शनाखाली केली जाते, ज्यामध्ये क्ष किरणांचा थोड्याफार प्रमाणात प्रभाव होऊ शकतो. अर्थात सर्वच डॉक्टर तुमच्या मुलाला कमीत कमी वेळाकरिता व अगदी कमीत कमी क्ष किरणांचा प्रभाव राहील अशी काळजी घेतात. या उपचारपद्धतीनंतर कुठल्याही प्रकारचे व्रण राहत नाहीत. एक फक्त छोटेसे छिद्र हे जांघेमधे राहते.

बऱ्याचदा तुमचा मुलगा लगेच बरा होतो व त्याला शक्य तितक्या लवकर रुग्णालयातून सुटी दिली जाते. अशा मुलांना तुम्ही अगदी दुसऱ्या दिवशीच आंघोळ पण घालू शकता. अशा मुलांना जेवण व आहार इतर मुलांप्रमाणे नेहमीप्रमाणे देऊ शकता. कधी कधी आहारातील पातळ पदार्थाचे प्रमाण कमी घ्यावे असे हृदयरोग तज्ञ सांगू शकतात. तसेच हृदयरोग तज्ञांकडून पुन्हा काही दिवसांनी पुन्हा तपासणी करण्याकरिता बोलविले जाऊ शकते.

बऱ्याचदा कुठल्याही औषधांची गरज पडत नाही आणि समजा गरज पडलीच तर डॉक्टर तुम्हाला तसा सल्ला देतील. हृदयात टाकल्या जाणाऱ्या डिव्हाईस प्लांटेशन शस्त्रक्रियेनंतर तुमच्या मुलाला रक्त पातळ ठेवण्यासाठी ॲस्पिरिनची गोळी पुढील सहा महिने पर्यंत दिली जाऊ शकते.


प्रश्न (६)

## माझ्या मुलाला हृदयाची शस्त्रक्रिया सांगितली आहे यामध्ये नेमके काय असते?


हृदयातील शस्त्रक्रिया या साधारणपणे हृदयातील मोठी छिद्रे जी डिव्हाईस किंवा कॅथेटर उपचार पद्धतीने बुजवली जाऊ शकत नाहीत ती बुजवण्यासाठी केल्या जातात, ही मोठी छिद्रे सर्जन निरनिराळ्या वस्तू वापरून शिवतात आणि याकरिता या शस्त्रक्रियेत हृदयगती थांबविली जाते आणि हृदय उघडे केले जाते. अशावेळी तुमच्या मुलाची रक्ताभिसरण व श्वसनक्रिया कृत्रिम हृदय–फुप्फुस मशीनद्वारे केली जाते. यावेळी तुमचा मुलगा हा पूर्णपणे खोल गुंगीमध्ये असतो. अशावेळी तुमच्या मुलाला कुठेही दुखणार नाही किंवा त्याला कुठल्याही घाबरणाऱ्या स्मृती राहणार नाहीत.

दुर्दैवाने त्याच्या छातीवर शस्त्रक्रियेचे व्रण मात्र ठळकपणे दिसून येतील. आता अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अगदी एक दोन दिवसांच्या बाळावरदेखील सहजपणे करता येतात. अर्थात त्या त्या बाळाचा असणारा आजार किती गुंतागुंतीचा आहे यावर या शस्त्रक्रियेचे स्वरूप अवलंबून असते.

खाली काही शस्त्रक्रियांची चित्रे दाखवली आहेत. यामध्ये छातीच्या समोरून चिरा देऊन हृदय शस्त्रक्रिया केली जाते असे दाखविले आहे.






**आकृती २ :** हृदयाची शस्त्रक्रिया छातीचा समोरचा भाग उघडून शस्त्रक्रिया करता येते.





**आकृती ३ :** हृदयातील छिद्र हे टाका वापरून किंवा शिवून बंद केले जाऊ शकते असे दाखविले आहे.

**आकृती ४ :** आणि ५ सुदृढ हृदय ब टेट्रोलॉजी ऑफ फेलॉटसच्या शस्त्रक्रियेमध्ये मोठे छिद्र बुजविले जाते आणि आकुंचित असलेली झडप उघडली जाते.




**आकृती ४ :** अ आणि ब टेट्रोलॉजी ऑफ फेलॉटस शस्त्रक्रियेमध्ये मोठे छिद्र बुजवताना दिसत आहे तर आकुंचन पावलेली झडप व आजूबाजूचा परिसर उघडा दिसत आहे.




**आकृती ५ :** टेट्रोलॉजीऑफ फेलॉटसच्या शस्त्रक्रियेमध्ये पॅच वापरून मोठे छिद्र बुजविले आहे तर आकुंचन पावलेली झडप दुरुस्तकेलेलीआहे.

प्रश्न (७)

## माझ्या मुलाची हृदय शस्त्रक्रिया झालेली आहे. आता त्याची काळजी मी कशी घ्यावी ?

हृदयाची शस्त्रक्रिया हा प्रत्येक पालककाकरिता नक्कीच घाबरून सोडणारा अनुभव असतो. परंतु सुदैवाने आता शस्त्रक्रियेच्या पद्धतींमध्ये बरीच प्रगती झाली असून चांगल्या तज्ञ डॉक्टरांच्या हाताने शस्त्रक्रिया झाल्यास शस्त्रक्रियेपश्चात जो काळ असतो तो सुखकर जातो. शस्त्रक्रियेनंतर तुमच्या मुलाची काळजी अगदी इतर मुलांसारखी घेतली जाऊ शकते, महत्त्वाचे हे की त्या मुलाला इतर मुलांसारखे सर्वसामान्य जीवन जगता यावे.

अशी मुले शस्त्रक्रियेनंतर सहा ते आठ आठवड्यानंतर लगेच शाळेत जाऊ शकतात. (चित्र ६) अर्थात त्यांना त्याकरिता शस्त्रक्रिया तज्ञांची रीतसर परवानगी असायला हवी. बऱ्याचश्या रुग्णांना काही आठवडे पर्यंत औषधे दिली जातात, जेणेकरून शस्त्रक्रियेनंतर त्यांचे रक्ताभिसरण पूर्व पदावर येऊ शकेल. आणि काही जणांना दीर्घ काळापर्यंत औषधी दिली जातात. जर एखादा कृत्रिम भाग शस्त्रक्रिया करता वापरला गेला असल्यास दीर्घकाळपर्यंत औषधे वापरावी लागू शकतात.

हृदयाच्या सर्वच शस्त्रक्रिया या सारख्या नसतात. काही शस्त्रक्रियेनंतर हृदय कमजोर होऊ शकते आणि अशां रुग्णांना आयुष्यभर डॉक्टरांच्या संपर्कात राहावे लागतेव त्यांचा सल्ला घ्यावा लागतो काही रुग्णांना पुन्हा शस्त्रक्रिया करण्याची गरज भासू शकते किंवा काहींना पुन्हा शस्त्रक्रिया लागू शकते किंवा स्टेंटची गरज भासू शकते.



आकृती ६ : शस्त्रक्रियेनंतर बरीचशी लहान किंवा मोठी मुले छान आनंदी वातावरणात खेळत असतात व लगेचच त्यांच्या सर्वसाधारण कृती करायला ती लगेच मोकळी होतात.

प्रश्न
(८)

## अशा मुलांचे खाणे, पिणे, लसीकरण किंवा आंघोळ करणे याबाबत सांगावे.

- सर्वच दूधपित्या मुलांना नेहमीप्रमाणे आईचे दूध पाजणे चालू ठेवावे. 'कांगारू मातृ पद्धत' अर्थातच कांगारू मॅटर्नल केअरचे पालन केल्यास बाळाची वाढ होण्यास, त्याचे वजन वाढण्यास व तो पूर्ववत होण्यास मदत होते.
- ज्या मुलांचे हृदय हे कमजोर आहे अशांनी पातळ पदार्थांचे सेवन कमी करावे असे सांगितले जाते.
- सर्वच मुलांना नेहमी प्रमाणे तीन ते सहा आठवड्यांनंतर लसीकरण केले जाऊ शकते ज्या मुलांना प्लीहाग्रंथी (स्प्लीन) नसेल त्यांना न्यूमोकॉकल लस घेणे अगदी जरुरी आहे.
- सर्वच मुले नेहमीप्रमाणे साबण व पाणी वापरून आंघोळ करू शकतात. तसेच हृदयशस्त्रक्रियेची जखम ही सांभाळून स्वच्छ धुतली गेली पाहिजे जेणेकरून त्यातून जिवाणू आत जाणार नाहीत याची काळजी घेतली जाते याकरिता क्लोर्हेक्सिडीन नावाचं सोल्युशन वापरणे आवश्यक असले तर ते तुमचे डॉक्टर तुम्हाला सांगतीलच.

प्रश्न
(९)

## मुलांच्या शारिरिक कृती व शाळेबद्दल काय?

बहुतांश लहान मुले, मोठी मुलेही शस्त्रक्रियेनंतर नेहमीप्रमाणे शारिरिक कृती करू शकतात. (चित्र ७अ आणि ब) त्यामुळे सर्व लहान मुलांना शस्त्रक्रियेनंतर चालण्यापासून, धावण्यापासून किंवा खेळण्यापासून रोखू नये. मोठ्या मुलांमध्ये शस्त्रक्रियेनंतर शारिरिक कवायती, जिममध्ये जाणे, पोहणे, कराटेसारखे खेल खेळणे हे हृदय रोग तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच करणे जरुरी आहे. एकूणच नेहमीसारखी शारिरिक व्यायाम हा कमी प्रमाणात का होईना परंतु फायदेशीर आणि हितावह आहे असे बहुतांश संशोधनपर लिखाणात आढळून येते.

सर्व लहान मुले व मोठी मुले यांनी शाळेत जावे यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. अगदीच ज्या काही मुलांना विशेष काळजी घेण्याचे सांगितले आहे त्यांनी ती विशेष काळजी घेऊन शाळेत जावे. काही शाळा डॉक्टरांकडून तशा प्रकारचं फिटनेस सर्टिफिकेट (सुदृढता प्रमाणपत्र)देखील मागू शकतात. तुमचे हृदय रोग तज्ञ नक्कीच ते देतील आणि महत्त्वाचे म्हणजे की मुलांच्या शाळेतील शिक्षकांना व इतर व्यक्तींना यासंदर्भात माहिती असली पाहिजे. त्यामुळे मुलाच्या हृदयशस्त्रक्रियेबद्दलची माहिती शिक्षकांपासून व शाळेतील व्यवस्थापनापासून कधीही लपवू नये.




**आकृती ७ :** अ आणि ७ब ...बहुतांश मुलेशस्त्रक्रियेविनाच्या पद्धती नंतर किंवा शस्त्रक्रियेनंतर अगदी सर्वसाधारण मुलांप्रमाणे खेळताना दाखविली आहेत.

## प्रश्न (१०)

## जर माझ्या मुलाची हृदयशस्त्रक्रिया झाली असेल तर पुढील त्यांच्या व्यवसायाबद्दल, लग्नाबद्दल किंवा त्याने मुले होऊ द्यावी की नाही याबद्दल मार्गदर्शन करावे.

ज्या मुलांची हृदयशस्त्रक्रिया झाली आहे अशी मुले कुठल्याही प्रकारचा व्यवसाय किंवा त्यांचे करिअर निवडू शकतात, अगदीच पायलट किंवा मिल्ट्री मध्ये जवान अशासारख्या व्यवसाय सोडल्यास ते इतर व्यवसाय निवडू शकतात. बरीचशी मुलं डॉक्टर, इंजिनीअर, वकील किंवा इतर व्यावसायिक होऊ शकतात.

तुमच्या मुलाच्या भविष्यातील होणाऱ्या जोडीदारासोबत तुम्ही त्याच्या हृदयशस्त्रक्रियेबद्दल अगदी मोकळी चर्चा करावी. अगदीच ज्यांचे खूप जास्त प्रमाणात हृदय निकामी असेल किंवा ज्यांच्या हृदयाचा आकार खूप आकार खूप मोठा असेल त्यांनीच फक्त लग्न करू नये कारण त्यांना थोड्याशा श्रमानेसुध्दा श्वास घेण्यास दम लागू शकतो. त्याचप्रमाणे ज्या महिलांच्या अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया किंवा झडप बदलण्याच्या शस्त्रक्रिया झाल्या असतील त्यांचीही नॉर्मल डिलिव्हरी झालेली आहे आणि त्या सुखी आयुष्य जगत आहेत.

तरीही कुठला व्यवसाय निवडावा, लग्न करावे की नाही, मुले होऊ द्यावी की नाही या सर्व गोष्टी हृदयरोग तज्ज्ञांशी सल्लामसलत करूनच निर्णय घ्यावा. विशेषतः ज्या शल्यचिकित्सक/सर्जननी शस्त्रक्रिया केली आहे, प्रत्यक्षात त्याचे हृदय बघितले आहे त्यांच्याशी सल्लामसलत करून याबाबतीत निर्णय घ्यावा.